दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक सागर राणा अभोरे | संपादक बद्रूभाऊ इंगोले

वाशीम ■ रविवार दिनांक 25 मे 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 01 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935

# आला रे आला, मान्सून आला!

■ १६ वर्षांत पहिल्यांदाच लवकर एंट्री ■ केरळमध्ये आठ दिवसआधीच मान्सून बरसला ■ १ जूनला मुंबईत पावसाच्या आगमनाची शक्यता

**मुंबई/कोझिकोड :** मे महिन्यातच राज्याला मान्सूनपूर्व म्हणजेच अवकाळी पावसाचा तडाखा बसला असतानाच, आता पावसाची वाट पाहणाऱ्यांसाठी आनंदाची बाब म्हणजे, मान्सूनचे केरळमध्ये आगमन झाले आहे. केरळमध्ये आठ दिवस आधीच मान्सून डेरेदाखल झाला असून गेल्या १६ वर्षांत नियोजित वेळेपेक्षा लवकर एंट्री होण्याची ही पहिलीच वेळ ठरली आहे. आता मान्सूनच्या आगमनानंतर पुढील प्रवासासाठी प्रतिकूल वातावरण असल्यामुळे मुंबईत १ जूनपर्यंत पावसाचे आगमन होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

केरळ हे मान्सूनचे भारतातील प्रवेशद्वार मानले जाते. केरळात प्रवेश केल्यानंतर नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सून देशभरात आगेकूच करतो. नैऋत्य मान्सून साधारणपणे १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो आणि आगेकूच करत ८ जुलै रोजी संपूर्ण देश व्यापतो, तर १७ सप्टेंबरच्या सुमारास तो वायव्य हिंदुस्थानातून माघारीचा प्रवास सुरू करतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्णपणे माघार घेतो, पण दरवर्षी १ जून या तारखेलाच केरळमध्ये दाखल ⟳ संमिश्र पानावर





## २७ मेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी

हवामान खात्याने केरळच्या किनारी आणि अंतर्गत भागात वादळाचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांसह सामान्य लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र आणि लक्षद्वीपच्या किनाऱ्यावर २७ मेपर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## राज्यात १ जूनपर्यंत वरुणराजाचे आगमन

महाराष्ट्रात १ जूनपर्यंत वरुणराजाचे आगमन होईल, असा अंदाज कुलाबा हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, गेल्या पाच-सहा दिवसांपासून पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आदी भागात पुढील दोन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून गोव्याच्या वेशीवर दाखल झाला असून, पुढच्या दोन दिवसांतच मान्सून महाराष्ट्रात धडकणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

**मान्सूनचे आगमन**

| | |
|---|---|
| २००९ | २३ मे |
| २०१० | ३१ मे |
| २०११ | २९ मे |
| २०१२ | ५ जून |
| २०१३ | १ जून |
| २०१४ | ६ जून |
| २०१५ | ५ जून |
| २०१६ | ८ जून |
| २०१७ | ३० मे |
| २०१८ | २९ मे |
| २०१९ | ८ जून |
| २०२० | १ जून |
| २०२१ | ३ जून |
| २०२२ | २९ मे |
| २०२३ | ८ जून |
| २०२४ | ३० मे |

## निवडक

### मुंबईत २८ मे रोजी १५ टक्के पाणीकपात

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच ठाणे व भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणाऱ्या पांजरापूर येथील उदंचन केंद्रामधील टप्पा क्रमांक १ येथे नवीन दाबवाढ नियंत्रण टाकी (अँटी सर्ज व्हेसल) कार्यान्वित करण्याचे काम पालिकेच्या वतीने हाती घेतले जाणार आहे. हे काम बुधवार, २८ मे रोजी सकाळी ९.४५ पासून रात्री १०.४५ वाजेपर्यंत एकूण १३ तासांसाठी नियोजित आहे. त्यामुळे मुंबई शहर विभाग ⟳ संमिश्र पानावर

### झारखंडमध्ये २ माओवादी ठार

**लतेहार :** झारखंडच्या लतेहार जिल्ह्यात शनिवारी सकाळी सुरक्षा दलांसमवेत झालेल्या चकमकीत दोन माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. त्यामध्ये झारखंड जनमुक्ती परिषदेचा म्होरक्या पप्पू लोहरा याचा समावेश आहे. त्याच्यावर १० लाख रुपयांचे इनाम जाहीर करण्यात आले होते, असे पोलिसांनी सांगितले. केंद्रीय राखीव पोलीस दल आणि झारखंड पोलिसांनी लतेहार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केलेल्या कारवाईत पप्पू आणि त्याचा साथीदार ठार झाले. पोलिसांनी त्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. या गटाचा आणखी एक माओवादी जखमी झाला ⟳ संमिश्र पानावर

### न्या. नागरत्ना कॉलेजियममध्ये सहभागी होणार

**नवी दिल्ली :** न्या. अभय ओक हे निवृत्त झाल्याने सुप्रीम कोर्टाच्या कॉलेजियममध्ये न्या. बी. व्ही. नागरत्ना सहभागी होणार आहेत. भविष्यात नागरत्ना या सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश होण्याच्या रांगेत आहेत. न्या. नागरत्ना या सेवाज्येष्ठतेच्या यादीत पाचव्या क्रमांकाच्या न्यायाधीश आहेत. त्या २९ ऑक्टोबर २०२७ रोजी सरन्यायाधीश म्हणून निवृत्त होईपर्यंत कॉलेजियमच्या सदस्य असतील. सध्या कॉलेजियममध्ये सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्या. सूर्यकांत, न्या. विक्रम नाथ, न्या. जे. के. महेश्वरी व न्या. नागरत्ना यांचा समावेश असेल. सुप्रीम कोर्टाच्या ⟳ संमिश्र पानावर

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अनेक वाहने धडकली

■ २ महिलांचा मृत्यू, ५ जण गंभीर ■ वाहतूक तासभर विस्कळीत

**मुंबई :** अनेक उपाययोजना करूनही मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघात होतच आहेत. शनिवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर अनेक वाहने एकमेकांवर धडकली. यात दोन महिलांचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. यामुळे महामार्गा वरील वाहतूक तासभर विस्कळीत झाली होती.

पुणे-मुंबई मार्गिकेवर खोपोली हद्दीत तीव्र उतारावर अनेक वाहने एकमेकांना धडकली. ज्यात तीन कार तीन बसेस आणि एका ट्रकचा समावेश होता. यात दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य चार जण गंभीर जखमी झाले. अश्विनी हळदणकर आणि श्रेया अवताडे अशी मृतांची नावे आहेत, तर वसुधा जाधव, रसिका अवताडे, सारिका जाधव, अविनाश जाधव, आणि अक्षय हळदणकर अशी अपघातातील जखमींची नावे आहेत. या सर्वांवर खोपोली आणि कामोठे येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातामुळे पुण्याहून मुंबईकडे येणारी वाहतूक विस्कळीत झाली होती. महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा, ⟳ संमिश्र पानावर





## शुभमन गिलकडे कसोटी नेतृत्वाची धुरा

**मुंबई :** रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गज क्रिकेटपटूंच्या कसोटीतील निवृत्तीनंतर आता टीम इंडियाची जबाबदारी युवा खेळाडूंवर येऊन ठेपली आहे. त्यातच इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा २५ वर्षीय शुभमन गिलच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. ऋषभ पंतकडे उपकर्णधारपद देण्यात आले आहे.

(सविस्तर वृत्त क्रीडा पान)

# केंद्र-राज्यांनी टीम इंडियाप्रमाणे काम केल्यास कोणतेही लक्ष्य अशक्य नाही

नीती आयोगाच्या बैठकीत मोदींचे प्रतिपादन

**नवी दिल्ली :** केंद्र आणि राज्य सरकारांनी जर टीम इंडियाप्रमाणे एकत्रित काम केले, तर कोणतेही लक्ष्य गाठणे अशक्य नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी नीती आयोगाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत केले.

विकासाचा वेग वाढविण्याची नितांत गरज आहे, असे नीती आयोगाने मोदी यांच्या हवाल्याने एक्सवर पोस्ट केले आहे. 'विकसित भारतासाठी विकसित राज्य २०४७' ही व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची संकल्पना आहे. विकसित भारत हे प्रत्येक भारतीयाचे लक्ष्य आहे. जेव्हा प्रत्येक राज्य विकसित असेल तेव्हा भारत विकसित होईल, हीच १४० कोटी ⟳ संमिश्र पानावर



सॅमसंगसह सर्वच मोबाइल कंपन्यांना

# ट्रम्प यांची २५ टक्के टॅरिफची धमकी

**वॉशिंग्टन :** ॲपलला अमेरिकेत उत्पादन न केल्यास २५ टक्के कर लावण्याची धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. त्यानंतर जगविख्यात मोबाइल कंपनी 'सॅमसंग'सह सर्वच मोबाइल कंपन्यांना ट्रम्प यांनी हीच धमकी दिली.

या कंपन्यांनी आपले स्मार्टफोन अमेरिकेत उत्पादित न केल्यास त्यांना २५ टक्के 'जशास तसा' कराचा सामना करावा लागेल. स्मार्टफोन अमेरिकेत बनवल्यास त्यांना कराचा सामना करावा लागणार नाही.

ट्रम्प यांनी 'ट्रूथ सोशल'वर पोस्ट करताना सांगितले की, मी ॲपलचे सीईओ ⟳ संमिश्र पानावर



# कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी ८.२५ टक्के व्याजदराला मंजुरी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने २०२४-२५ या वर्षासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी (ईपीएफओ) ८.२५ टक्के व्याजदराला मंजुरी दिली आहे. ईपीएफओ आता ७ कोटींहून अधिक भागधारकांना वार्षिक व्याज जमा करू शकेल.

ईपीएफओने २८ फेब्रुवारीला २०२४-२५ साठी ईपीएफवर जमा रकमेच्या ८.२५ टक्के व्याजदर ठेवण्याचा निर्णय जाहीर केला होता. गेल्यावर्षीही ८.२५ टक्के व्याजदर दिला होता. ८.२५ टक्के व्याजदर मंजुरीसाठी केंद्रीय अर्थ खात्याला पाठवण्यात आला.

कामगार खात्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, अर्थ खात्याने २०२४-२५ साठी ईपीएफवर ८.२५ टक्के व्याज देण्यास मंजुरी दिली. कामगार खात्याने गुरुवारी ईपीएफओला याबाबत ⟳ संमिश्र पानावर

## काही वर्षांत व्याजदरात कपात

ईपीएफओने फेब्रुवारी २०२४ मध्ये २०२३-२४ साठी व्याजदरात किंचित वाढ करून तो ८.२५ टक्के केला होता. २०२२-२३ मध्ये तो दर ८.१५ टक्के होता. मार्च २०२२ मध्ये २०२१-२२ साठी ईपीएफचा व्याजदर ८.१ टक्के केला होता, तर २०२०-२१ मध्ये व्याजदर ८.५ टक्के होता.

# ठाण्यात कोरोनाचा पहिला बळी

**ठाणे :** कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालयात कोरोनामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याने ठाणे शहरात भीतीचे वातावरण आहे. ठाणे महापालिका हद्दीत शुक्रवारपर्यंत कोरोनाचे १० नवे रुग्ण आढळले असतानाच, आता शनिवारी सकाळी एका २१ वर्षीय तरुणाचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.

या तरुणाला मधुमेहाच्या त्रासामुळे कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या तीन दिवसांत

## २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू

कोरोनाचे १० रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांवर घरीच उपचार सुरू आहेत. कोरोना रुग्ण आढळण्यास सुरुवात झाल्याच्या पार्श्वभूमीवर, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत महापालिका क्षेत्रातील कोरोना रुग्णस्थितीची माहिती घेतली.

शिवाजी महाराज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध माळगावकर म्हणाले की, "या तरुणाला ⟳ संमिश्र पानावर

**रूपाली चाकणकरांना पदावरून हटवण्यासाठी रोहिणी खडसेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

# महिला आयोगाच्या अध्यक्षांवरून नाराजीचे सूर

## नीलम गोऱ्हेंनीही साधला निशाणा

**मुंबई :** पुण्यातील वैष्णवी हगवणे हिचा सासरी छळ होत असल्याने तिने आत्महत्येचे पाऊल उचलल्याने राज्यभर हे प्रकरण चांगलेच गाजत आहे. या प्रकरणानंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या वादाच्या कात्रीत सापडल्या असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून रूपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून हटवण्याची मागणी केली आहे. त्यातच शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या तसेच विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही चाकणकर यांच्यावर निशाणा साधला आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या लेखी पत्रात रोहिणी खडसे म्हणतात की, "महिला आयोगाने त्यावेळी तत्काळ दखल घेतली असती, तर आज वैष्णवी हगवणे जिवंत राहिली असती. त्यामुळे या प्रकरणात आयोगाची जबाबदारी निश्चितच आहे. चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर कार्यक्षमतेने काम करत नाहीत. रुपाली चाकणकर 'पार्टटाइम' पदाधिकाऱ्यासारखे काम करत आहेत. त्यामुळे महिलांना न्याय मिळत नाही. अशा परिस्थितीत त्यांना त्यांच्या पदावरून हटवले जावे. महिला आयोगाकडे जवळपास ३२ हजार केसेस पेंडिंग आहेत. त्यामुळे आयोग महिलांना न्याय देण्यासाठी कमी पडत आहे. त्यामुळे पार्टटाइम महिला आयोगाच्या अध्यक्ष बदलून पूर्णवेळ अध्यक्ष महिला आयोगाला देण्यात यावा."

"पोलिसांनी या प्रकरणात किरकोळ कलमे लावली आहेत, त्यामुळे आरोपी सुटून जाण्याची शक्यता आहे. म्हणूनच आम्ही अधिक गंभीर कलमे लावण्याची मागणी करत आहोत. तसेच, या प्रकरणात बार कौन्सिलने आरोपीचे वकीलपत्र घेऊ नये, अशीही आमची ⟳ संमिश्र पानावर



## चाकणकरांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनास्त्र

वैष्णवी हगवणेचा हुंडाबळी आणि पोलीस, महिला आयोगाच्या दिरंगाईच्या निषेधार्थ तसेच आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'आप'सह बिटिया फाऊंडेशन आणि गुलाबो गँगकडून शनिवारी आंदोलन करण्यात आले. चाकणकर यांनी विरोधकांना चिल्लर' संबोधल्याचा आरोप करत पुण्यातील गुडलक चौकातील कलाकार कट्टा येथे 'थिल्लर पे चिल्लर फेको' आंदोलन करण्यात आले.

# ४० हजार रुपयांसाठी देशाशी गद्दारी

पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्याला कच्छमधून अटक

**अहमदाबाद :** गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील सीमावर्ती भागातून एटीएसने पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या एका व्यक्तीला अटक केली आहे. अटक केलेल्या व्यक्तीचे नाव सहदेव सिंह गोहिल असे आहे. सहदेव आरोग्य कर्मचारी असून एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, त्याने भारतीय सीमा, बीएसएफ आणि भारतीय नौदलाच्या कारवाया, परिसराचे फोटो आणि इतर संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती. त्याने गुजरातच्या अनेक सीमावर्ती भागांची माहितीही दिली होती होती.

चौकशीदरम्यान सहदेव सिंह जून-जुलै २०२३ पासून 'अदिती भारद्वाज' नावाच्या पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. दोघांमध्ये व्हॉट्सॲपवर संभाषण सुरू होते. जानेवारी २०२५ मध्ये सहदेव सिंहने त्याच्या आधार कार्डचा वापर करून एक भारतीय सिम कार्ड मिळवले ⟳ संमिश्र पानावर

## दिल्लीतील भंगार विक्रेत्याला अटक

**नवी दिल्ली :** भारतीय सैन्याची हेरगिरी केल्याच्या आरोपावरून उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) दिल्लीतल्या सीलमपूर येथील एका भंगार विक्रेत्याला अटक केली आहे. मोहसीन खान (४५) असे या आरोपीचे नाव असून शनिवारी त्याला दिल्ली उच्च न्यायालयासमोर हजर करण्यात आले तेव्हा न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला. न्या. स्वर्ण कांता शर्मा यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्या. शर्मा म्हणाल्या, मोहसीन खान ⟳ संमिश्र पानावर

दैनिक
# महाराष्ट्र जीत
रविवार दिनांक २५ मे 2025



## संपादकीय

## तरुण वयात अपंग होणाऱ्या भावंडांचं गाव!

ब्राझीलमध्ये एक गाव आहे. सेरिन्हा डोस पिंटोस हे या गावाचं नाव. ५००० लोकवस्तीचं हे गाव अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि त्यामुळेच संपूर्ण जगात सध्या या गावाची चर्चा आहे. या गावातील बहुसंख्य लोक एकमेकांचे चुलत, मावस, आतेभाऊ-बहीण किंवा रक्ताच्या नात्यानं नातेवाईक आहेत. खरं तर हे गाव नसून एक मोठा परिवारच आहे. आपलं गाव, आपला समाज आणि आपली कम्युनिटी त्यांनी इतर समाजापासून कायम वेगळी ठेवली. त्यामुळे त्यांचं गावही तसं दुर्गम आणि इतर जगापासून वेगळं आहे. आपलं वैशिष्ट्य कायम ठेवण्यासाठी इतर समाजापासून ते कायम वेगळेच राहिले. त्यामुळे त्यांच्यात लग्नं झाली तीही आपापसातच. चुलत-आते-मामे भावा-बहिणीत किंवा इतर नातेवाइकांत झालेल्या या लग्नांमुळे सगळं गाव तसं एकमेकांचं नातेवाईक आहे. त्यामुळे सगळ्याच गावकऱ्यांचं एकमेकांवर अतिशय जिवापाड प्रेम आणि जिवाला जीव देण्याची आपुलकी. पण या आनंदी गावाला गेल्या काही वर्षांपासून एक शापही मिळाला आहे. गावातली मुलं-मुली वयात आली, तरणीताठी झाली की एकाएकी ती अपंग होऊ लागली. त्यांच्यातली चालण्या-फिरण्याची शक्ती अचानक कमी होऊ लागली. जसजसं त्यांचं वय वाढू लागलं तसतसं अनेकांना तर एक पाऊलही टाकणं अशक्य झालं. त्यामुळे या गावात अनेक तरुण मुला-मुलींना आज अपंगांच्या सायकलशिवाय दुसरा पर्यायच राहिलेला नाही. त्याशिवाय कुठेही ती हिंडू-फिरूच शकत नाही. अचानक आपल्या गावात आपल्या मुलांना असा त्रास का होऊ लागलाय, याचं संपूर्ण गावाला कोडं पडलं. ज्यांची मुलं-मुली अपंग झालीत ते पालक आणि ही मुलंही भविष्याच्या चिंतेनं गलितगात्र झाली. देवाचाच बहुतेक आपल्या गावावर कोप झाला, असं त्यांना वाटलं. त्यामुळे त्यांनी मोठ्या प्रमाणात देवाची आराधनाही सुरू केली; पण कसचं काय, काहीही फरक पडला नाही. आजही तिथे अनेक मुलं वयात आली की अपंग होतात..

मग यामागचं रहस्य आहे तरी काय?

सिल्वाना सँटोस ही एक जीवशास्त्रज्ञ वीस वर्षांपूर्वी सहज म्हणून या गावात गेली होती. त्यावेळी तिला कळलं, सगळे गावकरी तसे हट्टेकट्टे, आनंदी, पण यांची मुलं वयात आली की ती अपंग होतात, अचानक त्यांच्या पायांतली शक्ती जाऊ लागते.. हा काय प्रकार आहे, तिलाही काही कळेना. मग त्यावर तिनं अभ्यास सुरू केला. त्यावेळी तिच्या लक्षात आलं, एकमेकांचे नातेवाईक असणं हेच या गावावरचं सर्वांत मोठं संकट आहे. रक्ताच्या नात्यातच सगळ्यांनी लग्नं केल्यामुळे त्यांची मुलं वयात आल्यावर अपंग होताहेत! 'स्पोआन सिंड्रोम' हे या विकाराचं नाव.

इतक्या लोकांना एवढ्या मोठ्या प्रमाणात हा विकार होणं ही खूपच दुर्मीळ घटना होती. किंबहुना जगातली ही पहिलीच घटना असावी. सिल्वानानं अत्यंत कठोर परिश्रम घेऊन एक रिपोर्ट प्रसिद्ध केला. तिच्या याच मेहनतीचं फळ म्हणून या विकाराला त्यानंतर वैश्विक मान्यता मिळाली. नात्यांत विवाह केल्यामुळेच, अनुवांशिक उत्परिवर्तनामुळे हा विकार संभवतो हे सिद्ध झालं. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यावर अजूनही काहीच ठोस इलाज नाही. उपचारांच्या माध्यमातून त्याची तीव्रता फक्त कमी केली जाऊ शकते !..

## महिलांशी अवमानकारक वर्तन व कायदा

आपण अनेक वेळा मुलीची छेड काढल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून वाचत असतो अनेक प्रकरणात मुली व तिचे पालक इज्जत जाईल हा विचार करुन तक्रार देत नाहीत. तर काही प्रकरणात मुलीने त्यास विरोध केला आणि पोलिसांत तिने छेडणाऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल केली, तर त्या मुलीवर हल्ला केला जातो, तर काही प्रकरणात निर्घृण हत्ये सारख्या घटना घडतात. आता छेडछाड करणे अजामीनपात्र गुन्हा मानला जातो. इंग्रजी शब्द "इव्हटिजिंग'साठी अन्य प्रचलित शब्द नाही. याचा अर्थ नारी शोषण किंवा मुलींना छेडणे असा आहे. महिलांकडे वाईट नजरेने पाहणे, छेडछाड, कारण नसतांना डोकावणे, त्यांच्यावर नजर ठेवून असणे, पाठलाग करणे या बाबी असामाजिक, अवमानकारक आणि बेकायदा आहेत. हॉटेल किंवा लॉजमध्ये छुप्या कॅमेऱ्यातून महिलांची छायाचित्रे घेण्यात आल्याच्या बातम्या अनेक वेळा वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होत असतात. मे २०१५ मध्ये मुजफ्फरनगरच्या बाघरा गावाजवळ तीन महिलांनी बसमधून उड्या टाकून आपली इज्जत वाचवली. बसच्या चालकाने या महिलांशी गैरवर्तन केल्याचा आरोप होता. रेल्वेतून प्रवास करणाऱ्या महिलांची छेड काढली जात असल्याच्या तक्रारी दाखल होत असतात. शेजारीच राहणारे तरुण मुलींच्या खोलीत डोकावून पाहण्याचा प्रयत्न करत असतात. ही सर्व प्रकरणे "इव्हटिजिंग' म्हणजे छेडछाडअंतर्गत येतात. अनेकदा अशा प्रकारांमुळे दंगली उसळल्याची उदाहरणे आहेत.



प्रेमीयुगुलांची समूहाकडून हत्या केली जाते. अशा घटनाही न्यायालयात येतात; पण बहुतेक प्रकरणे दाबून टाकण्यात आल्याचेही आपण बघतो. अशा घटना दाट लोकवस्त्या, उच्चभ्रू परिसर आणि हाउसिंग सोसायटीत घडतात. पोलिस दलातील काही मोठ्या पदावरील अधिकारी आणि कर्मचारी महिलांनाही हा त्रास सहन करावा लागतो. काही प्रकरणांची चर्चाही झाल्याची उदाहरणे आहेत. सायबर क्षेत्रातील महिला छेडछाडीची शिकार बनतात. अश्लील छायाचित्रे आणि दुष्प्रचार इत्यादी सोशल मीडियावर पोस्ट करणे हे प्रकार गुन्ह्याच्या सदरात येतात. नवे तंत्र आणि सूक्ष्म यंत्राच्या मदतीने छेडछाड केली जाते. हा महिला स्वातंत्र्यावर तसेच त्यांच्या खासगी जीवनावर आणि व्यक्तित्वावर हल्ला आहे. अशा प्रकारच्या इव्हटिजिंगच्या घटना पोलिस पूर्वी कलम २९४ किंवा ३५४ आयपीसीअंतर्गत नोंदवत असत. या गुन्ह्यात आरोपींना जामीन मिळत होता; परंतु आता दुरुस्ती झाल्यानंतर अशा प्रकरणात जामीन दिला जात नाही. कलम ५०६ आणि ५०९ अन्वये फौजदारी धमकी आणि अवमान तसेच महिलेला लज्जा वाटेल अशा कृत्याखाली खटला दाखल करण्यात येतो. आता काही दुरुस्त्यांनंतर असे गुन्हे अजामीनपात्र करण्यात आले आहेत. भारतीय दंड विधानातील कलम ३५४ थोडे स्पष्टपणे आणि विस्तृत स्वरूपात समजून घेऊया. हे सेक्शन छेडछाड आणि महिलांच्या शोषणाच्या घटनेत गुन्हे दाखल करतांना लावण्यात येते. यात महिलांच्या सन्मानास बळजबरीने धक्का पोहोचेल असे प्रकरण होते. हे सेक्शन महिलेची अब्रू आणि सन्मानास ठेच पोहोचेल, अशा रीतीने बळजबरी केली तर लावण्यात येते. यात एखाद्या महिलेस लज्जा वाटेल, असे कृत्य असले पाहिजे.

**एक ते पाच वर्षांची शिक्षा**

या प्रकरणात एक ते पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. याअंतर्गत गुन्हा दखलपात्र आणि कोणत्याही मॅजिस्ट्रेटद्वारा विचारात घेतला जाऊ शकतो. दंड संहिता (दुरुस्ती २००८)चे कलम २३ (२) द्वारे दिनांक ३१-१२-२००९ पासून या कलमाखालील गुन्ह्यात तडजोड करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. या दुरुस्तीपूर्वी न्यायालयाच्या परवानगीने ज्या महिलेवर बळजबरी अथवा हल्ला झाला आहे, तिच्याकडून तडजोड (कोर्टाच्या बाहेर समझोता करणे) करता येत होती. दुरुस्ती कायदा २०१३ च्या कलम २४(ग)द्वारे दि. ३ फेब्रुवारी १३ पासून हा गुन्हा अजामीनपात्र ठरवण्यात आला. कलम ३५४ (क) : हे नवे कलम तयार करण्यात आले. एखाद्या महिलेच्या अंगावरील वस्त्रे काढण्यासाठी बलप्रयोग करण्यात आल्यास हे कलम लागू करण्यात येते. हे दुष्कर्म करणाऱ्यास कमीत कमी एक वर्ष कैद, परंतु यात जास्तीत जास्त १० वर्षेही शिक्षा होऊ शकते. त्याचबरोबर दंडसुद्धा ठोठावण्यात येतो. जर शारीरिक संबंधाची स्पष्ट मागणी करण्यात आली असेल किंवा एखाद्या महिलेवर अश्लील शेरेबाजी केली असेल, तर तीन वर्षांची शिक्षा किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. कलम ३५४ (ख) मध्ये पुरुषाने स्त्रीला निर्वस्त्र होण्यास बाध्य केले, तर कमीत कमी तीन वर्षे कैद; ती ७ वर्षांपर्यंत वाढवता येते. त्याचबरोबर दंडाचीही तरतूद आहे. कलम ३५४ (ग) : हे कलम एखादी महिला तिच्या कामात व्यग्र असताना तिच्याकडे एकटक कोणी रोखून पाहत असेल तर किंवा तिचे छायाचित्र काढत असेल आणि ते प्रसिद्ध करत असेल, तर लावले जाते. जर यात तो दोषी ठरला तर कमीत कमी एक वर्षाची कैद, नंतर पुन्हा असेच कृत्य करणाऱ्यास तीन ते सात वर्षांची शिक्षा होऊ शकते. कलम ३५४ (घ) : महिलेची इच्छा नसताना तिच्याशी कोणी पुरुष अथवा त्या स्त्रीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला किंवा इलेक्ट्रॉनिक सूचनांचा वापर करत असेल किंवा ते मॉनिटर करत असेल तर महिलेचा असा पाठलाग करणे हा गुन्हा समजला जातो. या गुन्ह्यात तीन वर्षे कैद आणि दंड आकारण्यात येतो. वरील भारतीय दंड विधानातील तरतुदी निश्चितपणे कठोर आणि परिणामकारक आहेत. गेल्या ५ वर्षांचा विचार केला असता कोर्टात इव्हटिजिंगची अनेक प्रकरणे दाखल झालीत. यात किती प्रकरणांत आरोप सिद्ध झाले आणि शिक्षा ठोठावण्यात आल्या हा अध्ययनाचा विषय असला तरी ही पुरुषी विकृती ठेचायला हवीच . पुराव्याअभावी अनेक प्रकरणांत आरोपींना सोडून देण्यात येते. कोणत्याही प्रकारे छेडछाड करणे, कायद्यातील परिच्छेद १४, १५ आणि २१ चे उल्लंघन आहे. २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने इव्हटिजिंग रोखण्यासाठी राज्यांना काही निर्देश दिले देण्यात आले होते. म्हणजे, साध्या वेशातील महिला पोलिस कर्मचाऱ्यांना सार्वजनिक तसेच संवेदनशील स्थळी तैनात करण्यात यावे. काही संस्थांनीसुद्धा महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे. सीसीटीव्ही कॅमेरे कॉलेज, सिनेमागृह, बागा, उत्सव आदी ठिकाणी लावण्यात यावेत. जर सार्वजनिक वाहनातून छेडछाड होत असेल, तर पोलिस ठाण्यात जाऊन वाहनचालकाने माहिती द्यावी. सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना महिला हेल्पलाइन स्थापन करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या मात्र किती महिलांना महिला हेल्पलाईन नबंर माहिती आहे हे सांगणे फार कठीण आहे. शहरी भागातील काही प्रमाणात महिलांना माहिती आहे मात्र याच प्रमाण नसल्या सारख आहे. ज्याच्यासाठी महिला हेल्पलाईन आहे त्यांनाच जर हेल्पलाईन नबंर माहिती नसेल तर याचा उपयोग काय? या बाबत फारशी जनजागृती झाली नसल्याचे दिसून येते. महिलावर होणारे अन्याय, अत्याचार याच प्रमाण मोठ आहे मात्र महिलांना महिलासाठी असलेले कायदेच व काम करणा-या यंत्रणाच माहिती नसल्यास त्यांना न्याय मिळेल तरी कसा? महिलांच्या अवमानाच्या घटना पूर्णपणे थांबायला हव्यात. घर असो अथवा दार महिला ह्या सुरक्षीत असायला हव्यात. महिलां, तरुणीची छेड काढणा-यावर कठोर शासन व्हायला हवं.

महाराष्ट्र जीत

**महादेव हरणे.**
**पत्रकार दै. महाराष्ट्र जीत**
**मो. 9922224889**

## ४० हजार रुपयांसाठी देशाशी गद्दारी

आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये त्याने ते सिम कार्ड ओटीपीद्वारे अदिती भारद्वाजला दिले, ज्याद्वारे व्हॉट्सअॅप कॉलिंग आणि मेसेजिंग सुरू झाले होते.

**हेरगिरीच्या बदल्यात ४०,००० रुपये**

हेरगिरीच्या बदल्यात सहदेव सिंहला ४०,००० रुपयांपर्यंतची रक्कम मिळाली होती. तो पाकिस्तानसाठी कंत्राटी पद्धतीने काम करत होता. त्याचा फोन फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीमध्ये पाठवण्यात आला आहे, जिथे त्याचे चॅटिंग, लोकेशन आणि मीडिया ट्रान्सफरचे विश्लेषण केलं जाईल, अशी माहिती मिळत आहे.

**हेरगिरी नेटवर्कमध्ये आणखी लोकांचा सहभाग**

गुजरात एटीएस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. या हेरगिरी नेटवर्कमध्ये आणखी लोकांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. सुरक्षा एजन्सी आता कॉल डिटेल्स, आर्थिक व्यवहार आणि डिजिटल उपकरणांची चौकशी करत आहेत.

## हेरगिरीच्या आरोपावरून दिल्लीतील भंगार विक्रेत्याला अटक

याचे कथित गुन्हे वैयक्तिक अथवा संस्थात्मक हानीपेक्षाही गंभीर आहेत, जे देशाच्या अखंडतेला धोका निर्माण करतात. या प्रकरणात दाखल केलेला गुन्हा हा केवळ एखादी विशिष्ट व्यक्ती, संस्था अथवा कुठल्याही गटाविरोधातील गुन्हा नसून भारताची अखंडता, सार्वभौमत्व व सुरक्षेविरोधातील गुन्हा आहे. त्यामुळे या प्रकरणात तूर्त जामीन देता येणार नाही.

**एटीएसचा आरोप काय**

दुसऱ्या बाजूला मोहसीनच्या कुटुंबीयांनी त्याला खोट्या प्रकरणात अडकवले जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच त्याची दुसरी पत्नी पाकिस्तानात असल्याने तो तिकडे जात होता, असा दावा त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. मात्र, उत्तर प्रदेश एटीएसचा दावा आहे की, मोहसीनचे पाकिस्तानी संस्थांशी संबंध होते. त्याने भारतातील अंतर्गत सुरक्षेसंबंधीची महत्त्वाची माहिती त्यांना दिली आहे.

**सौम्य वागणूक नाही**

दरम्यान, न्यायालयाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली असून न्या. शर्मा म्हणाल्या, आरोपीची हेरगिरी कृत्ये राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हान आहे. त्यामुळे त्याला सौम्य वागणूक देता येणार नाही. हेरगिरीची कथित कृत्ये व परकीय संस्थांना संवेदनशील माहिती दिल्याच्या प्रकरणात जामीन मंजूर करता येणार नाही.

**पोखरणची माहिती दिली**

मोहसिन खानचे मोबाइल दुरुस्ती व रिचार्जचे दुकानही आहे. तो हेरगिरी करणाऱ्या सिंडिकेटचा भाग असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. तसेच पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील अधिकाऱ्याकडून त्याने पैसे मिळवल्याचाही त्याच्यावर आरोप आहे. तसेच त्याने पोखरण येथे भारतीय सैन्यातील परमजीत कुमारकडून मिळालेली माहिती बेकायदेशीरपणे परदेशी संस्थेला विकल्याचा दावा एटीएसने केला आहे. हे सगळे आरोप सिद्ध करण्यासाठी त्यांना आरोपीची चौकशी करायची आहे. त्यामुळे न्यायालयाने त्याला कोठडी सुनावली आहे.

## ट्रम्प यांची २५ टक्के टॅरिफची धमकी

टीम कूक यांना यापूर्वीच सांगितले की, अमेरिकेत विकल्या जाणारे आयफोन मायदेशी बनवावेत. ते भारत किंवा अन्य देशात बनवू नयेत. त्यामुळे 'अॅपल'वर २५ टक्के कर लागेल. या निर्णयाचा फटका 'अॅपल'च्या शेअरला बसला आहे. कंपनीचे समभाग २.६ टक्क्यांनी घसरले. यामुळे कंपनीचे ७० अब्ज डॉलरचे भागभांडवल घसरले.

ट्रम्प यांच्या धमकीमुळे अॅपलच्या अडचणी वाढल्या आहेत. कारण अॅपल आता आयफोनचे उत्पादन चीनमधून भारतात आणत आहे. अमेरिकेत विकले जाणारे बहुतांशी आयफोन हे 'मेड इन इंडिया' असतील, असे वृत्त आहे.

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अनेक वाहने धडकली

देवदूत यंत्रणा, खोपोली पोलीस आणि हेल्प फाऊंडेशनची पथकाने तातडीने मदत व बचावकार्य सुरू केले. जखमींना रुग्णालयात दाखल केले. यानंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली. त्यानंतर महामार्गा वरील वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली. अपघातामागचे कारण समजू शकले नाही.

## कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी ८.२५ टक्के व्याजदराला मंजुरी

सूचना दिली. ही व्याजाची रक्कम ईपीएफओच्या सात कोटी भागधारकांच्या खात्यात जमा केली जाईल.

केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली २८ फेब्रुवारीला नवी दिल्लीत ईपीएफओच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाची २३७ वी बैठक झाली. यात व्याजदरावर निर्णय घेण्यात आला.

## आला रे आला, मान्सून आला!

होणारा पाऊस यंदा आठवडाभर आधीच दाखल झाला आहे. याआधी २००९ आणि २००१ मध्ये मान्सून २३ मे रोजीच दाखल झाला होता. गेल्या वर्षी २०२४मध्ये मान्सून ३० मे रोजी केरळमध्ये धडकला होता. १९१८ मध्ये सर्वात लवकर म्हणजेच ११ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला होता. आता यंदा मान्सून लवकर दाखल झाल्याने सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

हवामान विभागाने शनिवारी मुसळधार पावसाचा आणि

## पान १ वरून

दुसरा अतिउष्णतेचा इशारा दिला आहे. गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळच्या किनारी भागात २०० मिमीपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे पुढील सात दिवस या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अरबी समुद्रात कमी दबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून केरळमध्ये मुसळधार पाऊस होत आहे. केरळव्यतिरिक्त दक्षिण आणि मध्य अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्र, लक्षद्वीपचा काही भाग, कर्नाटक, तमिळनाडू, दक्षिण आणि मध्य बंगालचा उपसागर, उत्तर बंगालचा उपसागर आणि ईशान्य राज्यांच्या काही भागात मान्सून पुढे वाटचाल करणार आहे. तसेच दक्षिण कोकण-गोवा किनाऱ्यावरील पूर्व मध्य अरबी समुद्रावर कमी दाबाची हवामान प्रणाली निर्माण झाल्याची नोंद आहे. पुढील ३६ तासांत उत्तरेकडे सरकताना ही कमी दाबाची हवामान प्रणाली आणखी मजबूत होऊ शकते आणि पश्चिम किनारपट्टीच्या काही भागात पावसाची शक्यता आहे.

यंदा देशभरात पाऊस सरासरी आणि सरासरीपेक्षा जास्त पडणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. देशात मान्सूनचा परिणाम शेतीवर होत असतो. मान्सून वेळवर झाल्यास देशातील कृषी क्षेत्राचे उत्पादन चांगले येते. ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी मान्सून महत्त्वाचा ठरतो. धरणातील जलसाठ्यात वाढ होत असल्याने पाणीटंचाईचे संकटही दूर होते.

**सिंधुदुर्ग जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात शनिवारी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून किनारपट्टी भागात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या २४ तासांत जिल्ह्यात ७३ मिमी पावसाची नोंद झाली असून सर्वाधिक पाऊस कणकवली येथे १३० मिमी पावसाची नोंद झाली आहे. समुद्रात चक्राकार स्थिती निर्माण झाल्याने वादळसदृश स्थिती निर्माण होऊन समुद्र खवळला आहे. त्यामुळे ३ नंबरचा बावटा लावण्यात आला असून मच्छिमारांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## केंद्र-राज्यांनी टीम इंडियाप्रमाणे काम केल्यास कोणतेही लक्ष्य अशक्य नाही

जनतेची आकांक्षा आहे, असे मोदी यांनी नमूद केले.

**किमान एक पर्यटनस्थळ विकसित व्हावे**

प्रत्येक राज्य, प्रत्येक शहर, प्रत्येक नगरपालिका आणि प्रत्येक गाव विकसित करणे हे आपले लक्ष्य असले पाहिजे, जर आपण त्या दृष्टिकोनातून काम केले तर आपल्याला विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २०४७ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार नाही. जागतिक कीर्तीच्या सर्व सुविधा आणि पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असे किमान एक पर्यटनस्थळ प्रत्येक राज्यात विकसित झाले पाहिजे, असेही मोदी यांनी सुचविले. 'वन स्टेट, वन ग्लोबल डेस्टिनेशन'मुळे शेजारचे शहरही पर्यटनस्थळ म्हणून विकसित होण्यास मदत होईल. भारतामध्ये झपाट्याने शहरीकरण होत असून आपण भविष्यातील सुसज्ज शहरांसाठी कार्य केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

**महिलांचाही सहभाग हवा**

विकास, नवी कल्पना आणि टिकावूपण ही भारतातील शहरांच्या विकासाचे इंजिन असले पाहिजे आणि महिलांचाही त्यामध्ये सहभाग असला पाहिजे, असे मोदी यांनी स्पष्ट केले. ऑपरेशन सिंदूरनंतर मोदी यांची सर्व मुख्यमंत्र्यांसमक्ष आयोजित करण्यात आलेली ही पहिलीच बैठक होती.

## ठाण्यात कोरोनाचा पहिला बळी

मधुमेहचा आजार होता. त्याला गुरुवारी टाइप-१ मधुमेह आणि अॅसिडोसिसच्या गुंतागुंतीमुळे कळवा येथील महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती खालावत असल्यामुळे त्याला अतिदक्षता विभागात हलविण्यात आले होते आणि तिथे त्याला कृत्रिम श्वसन यंत्रणेवर (व्हेंटिलेटर) ठेवण्यात आले होते. शुक्रवारी त्याची कोरोना चाचणीही करण्यात आली होती. या चाचणीचा अहवाल शुक्रवारी रात्री आला. त्यात त्याला कोरोनाची लागण झाल्याचे निदान झाले. यानंतर त्याला रुग्णालयातील विलगीकरण कक्षात हलविण्यापूर्वीच त्याचा शनिवारी सकाळी मृत्यू झाला."

कोरोना रुग्णांच्या तपासणीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने तसेच सर्व रुग्णालयांनी सतर्क रहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. तसेच, कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. ठाणे महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी सांगितले की, "या तरुणाला वयाच्या सातव्या वर्षापासून मधुमेहाचा आजार होता. मधुमेह आणि अॅसिडोसिसच्या गुंतागुंतीमुळे उपचारासाठी दाखल झालेल्या या तरुणांच्या फुफ्फुसांमध्ये संसर्ग झाला होता. त्यामुळे त्याची कोरोना चाचणी करण्यात आली होती. त्याचा अहवाल सकारात्मक आला होता."

## महिला आयोगाच्या अध्यक्षांवरून नाराजीचे सूर

विनंती आहे. या घटनेत जर एखादा पोलीस अधिकारी हगवणे कुटुंबीयांना धमकावत असेल, तर त्या अधिकाऱ्याची सखोल चौकशी झाली पाहिजे," असेही त्यांनी म्हटले आहे.

नीलम गोऱ्हे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यासह पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राज्य महिला आयोगाने मयुरी जगतापची केस कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्यानुसार कार्यवाही केली असती, तर आत्तापर्यंत मयुरीला तिच्या प्रॉपर्टीत वाटा मिळाला असता, असे मत गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

**महिला आयोगाचे सदस्य नेमले जावेत -गोऱ्हे**

महिला आयोगाचे सदस्य लवकर नेमले जावेत. तसेच, बालहक्क आयोगाच्या अध्यक्षांची मुदत संपली असून त्यांनाही लवकर नेमले जावे, अशी विनंती नीलम गोऱ्हे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. त्या म्हणाल्या की, "राज्य महिला आयोगाचे काम बरोबर आहे की चूक, हे 'ट्रायल बाय मीडिया' किंवा 'ट्रायल बाय सोसायटी' पद्धतीने ठरू नये. मात्र, आयोग जे कार्य करत आहे, ते करताना त्यांनी काही तज्ञ लोकांकडून किंवा अनुभवी लोकांना विश्वासात घेतले पाहिजे."

## मुंबईत २८ मे रोजी १५ टक्के पाणीकपात

आणि पूर्व उपनगरांतील बहुतेक विभागांचा पाणीपुरवठा प्रभावित होणार आहे. या १३ तासांच्या कालावधीत शहर विभाग व पूर्व उपनगरांमध्ये १५ टक्के पाणीकपात लागू करण्यात येणार आहे. तसेच ठाणे व भिवंडी -निजामपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या भागास बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा होतो त्या भागांसदेखील ही १५ टक्के पाणीकपात लागू राहणार आहे.

## झारखंडमधील चकमकीत २ माओवादी ठार

असून त्याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून एक रायफल हस्तगत करण्यात आली आहे. लोहरा आणि त्याचे साथीदार जंगलात लपून बसल्याची खबर मिळाल्यानंतर संयुक्त पथकाने शोधमोहीम हाती घेतली होती. सुरक्षा दलांना पाहताच पप्पू आणि साथीदारांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिले. त्यामध्ये दोन माओवादी ठार झाले, असे पोलिसांनी सांगितले.

## न्या. नागरत्ना कॉलेजियममध्ये सहभागी होणार

सूत्रांनी सांगितले की, सरन्यायाधीश गवई हे येत्या सोमवारी कॉलेजियमची बैठक घेणार आहेत. यात सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या रिक्त जागांवर चर्चा केली जाणार आहे. न्या. ओक यांच्या निवृत्तीनंतर सुप्रीम कोर्टात तीन न्यायाधीशांच्या जागा रिक्त आहेत. १९९३ पासून सुप्रीम कोर्टाच्या पाच वरिष्ठ न्यायाधीशां कडून कॉलेजियम शिफारशींवरून न्यायाधीशांची नेमणूक सुप्रीम कोर्टात व २५ हायकोर्टात केली जाते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यम प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

## खानापुरात वाहतूक कोंडीमुळे वराडी मंडळीचा उडाला फज्जा.

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**



देगलूरःनांदेड -देगलूर राज्य महामार्गावर देगलूर तालुक्यातील खानापूर येथे बेशिस्त वाहनधारकांच्या वाहन चालवण्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी झाली होती. वाहतुकी कोंडी इतकी मोठी झाली की वाहतुकीच्या रांगा लांबच लांब ६ ते ७ कि.मी. अंतरापर्यंत लागल्या होत्या. तब्बल तीन तास वाहतूक कोंडी झाली होती. वन्नाळी ते मुजळगाफाट्यापर्यंत वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीमुळे वऱ्हाडी मंडळीची मोठी गच्छंती झाल्याचे दिसून आले. ऐन पावसात सुरू झालेल्या वाहतूक कोंडीमुळे लग्न कार्यासाठी निघालेली वऱ्हाडी अडकून पडल्यामुळे वेळेवर लग्न लावण्याचे वऱ्हाडी मंडळाचे स्वप्न भंगले.या वाहतूक कोंडीमुळे अनेक रुग्णांनाही वेळेवर दवाखान्यात पोहोचता आले नाही . चाकरमान्यांनाही या वाहतूक कोंडीचा समस्येचा फटका बसला शेवटी या वाहतूक कोंडीचा व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसारित झाल्यानंतर देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, उपनिरीक्षक नरहरी फड घटनास्थळी दाखल होत वाहतूक कोंडीची समस्या सोडविली या कामी खानापूर येथील युवकांनीही मदत केल्याचे दिसून आले.

## मंगरूळपीर येथे आनापान ध्यान साधनेचा शेकडोनी घेतला लाभ..

**महाराष्ट्र जीत .. तालुका प्रतिनिधी.**

***अजय भगत....मंगरूळपीर...***



**मंगरूळपीरः** आज दि. 24.05.2025शनीवार रोजी व्यंकटेश फंक्शन हॉल मंगरुलपीर जि वाशिम येथे सर्व वयोगटातील महिला , पुरुष , मुले , मुली सर्वासाठी आनापान ध्यान साधना ( अर्थात विपश्यनेची प्रथम स्टेप ) मैडिटेशन संपन्न झाले .यावेळी विश्व विपश्यनाचार्य पूज्य सत्यनारायण गोयनका गुरुजीच्या मार्गदर्शना द्वारे वरिष्ठ विपश्यना आचार्य श्री जनार्दन जे भगत यांनी आनापान ध्यान साधनेचे परिचय करून दिला. याप्रसंगी बाल आचार्य लताताई भगत उपस्थित होत्या. यावेळी शेकडो पुरुष, महिलानी आनापान ध्यान साधनेचा लाभ घेतला. यावेळी श्री शांताराम कांबळे श्री मनोहर भडांगे व व्यंकटेश हॉटेल चे मालक श्री भगवानराव गावंडे यांनी विपश्यने बद्दल ची माहिती देवून मार्गदर्शन केले. शेवटी काही महिला पुरुषानी आलेली अनुभूति व्यक्त करुन समाधान व्यक्त केले.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** स्थानिक जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे दिनांक 24 मे 2025 रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय येथे रुग्णांना मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे मनसे जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वरागडे यांच्या नेतृत्वात फळ वाटप करण्यात आले. यावेळी या फळ वाटप कार्यक्रमाला उपस्थित वाशिम जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र भोयर. मालेगाव.जिल्हा उपाध्यक्ष अतिष डहाळे.वाशिम शहराध्यक्ष शिवाभाऊ इंगोले.वाशीम शहर उपाध्यक्ष गजानन इंगोले. वाहतूक सेना शहर अध्यक्ष उमेश टोलमारे. वाहतूक सेना शहर उपाध्यक्ष उमेर शेख. निखिल बुरकुले वाहतूक सेना सहचटणीस देविदास जयताडे. गणेश चव्हाळे.विजय शिंदे. ईत्यादी होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वाशिम जिल्ह्यात विविध ठिकाणी अमित ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वाशिम जिल्हा अध्यक्ष राजू पाटील किड्से व वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे यांनी दिली आहे.



## लेंडी विश्राम गृह कार्यालय ईटग्याळ प.दे कॅम्प दयनीय अवस्थेत.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे**

मुखेड तालुक्यातील महत्वकांक्षी असलेला लेंडी प्रधान प्रकल्प बहु चर्चित आहे, यामध्ये मुख्य म्हणजे शासकीय विश्रामगृह बाहेरील अवस्था दयनीय पद्धतीची झाली आहे, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे ते तात्काळ सुधारावे, व लेंडी परिसरातील जलसंपदा अंतर्गत असलेले मुख्य रस्ते, गळभरणी मुख्य संरक्षण दगडी भिंत महिना मध्ये काम सुरू होईल, यापूर्वी दगड गोटे, मुरूम टाकून रस्ते बांधकाम साठी तयारी करावी, पावसाचा जोर वाढत असताना सगळी यंत्रणा कामाला लागली ,तशा पद्धतीने काम करण्यात यावे,या नागरिकांची मागणी जोर धरत आहे.






## खारघर सेक्टर १४ मधील कब्रस्तानाच्या जागेवरील अनधिकृत वापरावर तातडीची कारवाई करावी – आमदार प्रशांत ठाकूर यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

महाराष्ट्र जीत




**पनवेल(प्रतिनिधी)** खारघर मधील सेक्टर १४ येथील कब्रस्तानासाठी सिडकोने दिलेल्या जागेचा वापर अवैधपणे मशिद व अन्य धार्मिक कार्यक्रमाकरिता करण्याबरोबरच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झालेल्या अनधिकृत बांधकामांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांच्याकडे केली. सिडकोने कब्रस्तानासाठी दिलेल्या जागेचा हेतुपुरस्सर अनधिकृतरीत्या मशिद व धार्मिक कार्यक्रमांसाठी वापर केला जात असल्याच्या गंभीर तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळासह भेट घेत या गंभीर विषयावर पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांचे लक्ष वेधले. या शिष्टमंडळात त्यांच्यासोबत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष नितेश पाटील, विश्व हिंदू परिषदेच्या प्रसन्ना धर्माधिकारी, क्रिश्ना बांदेकर, हिंदू जागरण मंचचे शिवम सिंग, ॲड. गायत्री खडवडकर, आदित्य कांबळे, शैलेंद्र त्रिपाठी आदींचा समावेश होता. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस आयुक्तांना निवेदनही दिले. या निवेदनातून विषयाचे गांभीर्य त्यांनी अधोरेखित केले. खारघर सेक्टर १४ येथील जागा सिडकोने कब्रस्तास्तानाकरिता राखीव ठेवली असतानासुद्धा सदर जागेचा वापर हा हेतुपुरस्सररित्या मशीद महणून केला जात असून सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नमाज पठण व इतर धार्मिक कार्यक्रमाचे नियमितपणे आयोजन होत असल्याचे निदर्शनात आले असून हे अत्यंत चुकीचे व संतापजनक आहे. या प्रकारांमुळे सदर परिसरातील सामाजिक सलोखा धोक्यात आला असून आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या परिसरात मुस्लीम समाजाची लोकवस्ती नसतानादेखील मुद्दामून हेतुपूर्वक या सर्व गोष्टी केल्या जात आहेत. जाणीवपूर्वक मुस्लीम समाजातर्फे या कब्रस्तानच्या जागेचे कब्रस्तान मशीद असे संबोधन केले जाते व याठिकाणी नमाज पठणाकरीता तसेच धार्मिक कार्यक्रमाकरीता त्या समाजातील लोकांना बोलावले जात असल्याचे लक्षात आले आहे. तसेच या भूखंडावर कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता मोठयाप्रमाणात नमाजाकरीता सभागृह तसेच स्वच्छतागृह बांधण्यात आलेली असून त्याकरीता प्रचंड खर्च करून ग्रॅनाईट व मार्बलचा वापर केला आहे. एवढे सगळे अनधिकृत बांधकाम होत असताना सिडको प्रशासन व पोलीस प्रशासन यापैकी कुणालाही याबाबत अजिबात काही माहिती मिळत नाही व त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही हे आश्चर्यकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच मध्यंतरी याच खारघर परिसरात या समाजाच्या इज्तिमा कार्यक्रमानंतर एक हिंदू बांधवाला जीवे मारण्याचा अनुचित प्रकार घडले आहे. त्यानंतर या परिसरांत प्रचंड तणाव निर्माण झाला होता व सामाजिक परिस्थिती पूर्णपणे विस्कळीत होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेमुळे दोन्ही समाजांत प्रचंड तेढ निर्माण झाली होती व दंगलसदृष्य परिस्थिती झाली होती. त्यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्याकरिता पोलिस प्रशासन व लोकप्रतिनिधी यांना अथक परिश्रम घ्यावे लागले होते. अशातच आता सेक्टर १४ मधील कब्रस्तानच्या जागेचा अवैधरित्या मशिद व धार्मिक कार्याकरीता जो विनदिक्कत वापर होत आहे त्याबद्दल अन्य समाजात प्रचंड राग आहे व त्यासंदर्भात तेथील स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी वारंवार पाठपुरावा करूनसुद्धा प्रशासनामार्फत अद्यापही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खेदजनक आहे. त्यामुळे प्रशासनातर्फे अजुनही दिरंगाई झाली तर त्या ठिकाणी दोन्ही समाजांमध्ये काहीतरी अनुचित प्रकार होऊन सार्वजनिक शांतता बिघडण्याची व कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. वारंवार तक्रारी करूनही कब्रस्तानसाठी दिलेल्या जागेवर खारघरचे रहिवासी नसलेल्या लोकांकडून नमाज पठण केले जाते व त्याच माध्यमातून एका समाजाला सातत्याने डिवचण्याचा प्रयत्न करणे हे प्रकार थांबविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करून कब्रस्तानाचे अवैधरित्या मशिदीत रूपांतर करणाऱ्या संबंधित ट्रस्टींवर व त्यांना पाठबळ देणाऱ्या व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांच्याकडे केली आहे.

## इंद्रराज कनिष्ठ महाविद्यालयात इ. बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न



महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :**

**सिल्लोड** - इंद्रराज कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या उच्च माध्यमिक अर्थात इयत्ता बारावी च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयात नुकताच उत्साहात पार पडला. या समारंभात, विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केल्या बद्दल त्यांचा सत्कार व कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अशोक देवरे तर प्रमुख पाहुणे म्हणून योगेश रोजेकर उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब आणि उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्कार करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यामध्ये कु. केसरे तनश्री , सुरडकर वैष्णवी, सुरडकर ललित, पोफळे वैष्णवी, इंगळे साक्षी, तांबट प्रथमेश, पवार गायत्री, जाधव रितेश, फाळके ईश्वर, पेहरकर तेजस, शेवरले पायल आदींचा समावेश आहे. या सर्वांचे व त्यांच्या पालकांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे श्री. योगेश रोजेकर यांनी 100% निकालाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना त्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी काही विद्यार्थ्यांनी व पालक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व महाविद्यालयाचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोमनाथ घार्गे यांनी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला..!! अहिल्यानगर जिल्ह्याचा दांडगा अनुभव

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी**




अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची बृहन्मुंबई येथे पोलीस उप-आयुक्त पदी बदली झाली आहे, त्यांच्या जागी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती झाली असून. त्यांनी शुक्रवारी दुपारी पोलीस अधीक्षक म्हणून मावळते राकेश ओला यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे, सोमनाथ घार्गे यापूर्वी श्रीरामपूर येथे 2008 ते2009 या कालावधीत पोलीस उपाधीक्षक म्हणून काम केले होते त्यांचा कार्यकाळ त्यांनी दरोडा प्रतिबंधक पथकांचे नेतृत्व केले आणि पापड्या काळ्या टोळीचा पर्दाफाश करून गुन्हेगारीला आळा घालण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. घार्गे यांचा अनुभव आणि त्यांची गुन्हेगारी विरोधी रणनीती त्यामुळे ते अहिल्यानगरच्या पोलीस प्रशासनाची योग्य निवड मानली जात आहे. राकेश ओला यांनी ऑक्टोंबर 2022 मध्ये अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला होता, त्यांनीही आपल्या दोन वर्षाच्या कार्यकाळात जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात नेहमीच प्रयत्नशील राहिले, जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने करीत अनेक आरोपींना अटक केली खून,दरोडे यासारख्या गुन्हेगारीवर त्यांनी विशेषत लक्ष केंद्रित केले होते, त्यांनी आपल्या कार्यकाळात जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, नूतन पोलीस अधीक्षक घार्गे हे मूळचे सातारा जिल्ह्यातील असून अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक नियुक्ती म्हणून अहिल्यानगरच्या पोलीस प्रशासनासाठी नव्या संधी आणि आव्हानांचा कालावधी ठरणार आहे त्यांचा अनुभवाचा फायदा ठेवणे आणि सामान्य नागरिकांना नियंत्रण ठेवणे आणि सामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरणात प्रदान करणे हे त्यांच्यासमोर मोठे आव्हान असणार आहे,*

## मान्सूनपूर्व तयारीचा वाशिम पॅटर्नः पुरस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)दि.२४ मे**



जिल्हा प्रशासनाने येत्या मान्सून हंगामासाठी संपूर्ण तयारी केली असून संभाव्य पुरस्थिती हाताळण्यासाठी विविध उपाययोजना आणि यंत्रणा राबवण्यात आल्या आहेत. दि. ६ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय मान्सून आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना व आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा व तालुकास्तरावर २४x७ नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. राज्य आपत्कालीन राखीव दल नागपूर पथकाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण व मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८३ गावांना पूराचा संभाव्य धोका असून त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठीच्या सुविधा, आपत्ती साहित्याची तपासणी आणि सज्जता पूर्ण करण्यात आली आहे. पुरामुळे बाधित होणाऱ्या भागांमध्ये ३०० आपत्ती मित्र, ४८ ॲम्ब्युलन्स, ३ बोट, ७ अग्निशमन वाहनांसह इतर यंत्रणा कार्यरत आहेत. सुरक्षिततेसाठी जीवनरक्षक साहित्य – १३३ लाईफ जॅकेट्स, १११ लाईफ रिंग्स, १८ सर्च लाईट्स, १८०० मीटर बचाव दोरी, ३ पोर्टेबल लाईट्स आदी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील शोध व बचाव पथके सज्ज असून १०५ पोहणारे पोलीस कर्मचारी आपत्कालीन सेवा देण्यासाठी तत्पर आहेत. पुरस्थितीत नागरिकांनी घ्यावयाची काळजी, अफवांपासून दूर राहणे, महत्त्वाचे कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, शुद्ध पाण्याचा वापर करणे अशा सूचना जनजागृतीद्वारे देण्यात येत आहेत.पुराच्या पार्श्वभूमीवर ४६ संरक्षक कामांना शासन मान्यता प्राप्त झाली असून ही कामे प्रगतीपथावर आहेत. एसओपी तयार करण्यात आले असून जनजागृतीसाठी पोस्टर व माहितीपत्रके वितरण करण्यात आले आहे. "मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून जिल्ह्यातील सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रत्येक नागरिकाचे संरक्षण हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. संभाव्य आपत्तीला सामोरे जाण्यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन आणि संसाधनांची सुनिश्चितता केली आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपत्तीच्या वेळी शांतता राखावी, अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि स्थानिक प्रशासनाशी सहकार्य करावे. "जिल्ह्यात संभाव्य पुरपरिस्थितीचा विचार करून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या प्रसंगी जलद प्रतिसाद आणि योग्य समन्वयासाठी आमचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे." जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत

## घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटपास सुरुवात नांदेड जिल्ह्यात माहूर तालुक्यातून शुभारंभ

### घरकुल लाभार्थ्यांनी मानले शासनाचे आभार

### आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव यांनी वडसा येथे केला शासनाच्या अभिनंदनीय उपक्रमाचा शुभारंभ

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**





महाराष्ट्र शासनाच्या वतीने लाखोच्या संख्येने मंजूर केलेले केलेल्या घरकुल योजनेच्या बांधकामासाठी प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू देण्याचा शासनाच्या स्वप्नपूर्ती संकल्पचा शुभारंभ आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव यांनी घरकुल लाभार्थ्यांना मौजे पडसा वडसा टाकळी येथून मोफत वाळू वाटपाच्या योजनेचा शुभारंभ केला यावेळी शासनाच्या अभिनंदनिय उपक्रमाबद्दल माहूर तालुक्यातील घरकूल लाभार्थ्यातून अभिनंदनची लाट उसळली असून लाभार्थ्यांनी घरपोच मोफत वाळू मिळताच प्रचंड जल्लोषात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आमदार भिमराव केराम सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीथ चंद्र दोंथूला तहसिलदार किशोर यादव यांचे आभार मानले संपुर्ण तालुक्यांतील घरकुल लाभार्थ्यांना सोमवार पासून वाळू उपलब्ध करून देणार असल्याचे तहसिलदार किशोर यादव यांनी यावेळी सांगितले आहे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दि 8 एप्रिल व 30 एप्रिल रोजी घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील संपूर्ण मंजूर असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना उपलब्ध होईल तिथून पाच बरास मोफत वाळू देण्याचे जाहीर केले होते त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्हे आणि तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यासाठी उपलब्धतेची चाचणी करण्यात येत होती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीथ चंद्र दोंथूला यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सर्व मंडळ अधिकारी तलाठ्यांना सोबत घेऊन वाळू स्त्रोतांची पाहणी करून दि 24 रोजी मौजे पडसा येथून मोफत वाळू वाटप योजनेचा शुभारंभ केला यावेळी आमदार भीमराव केराम यांनी लाभार्थ्यांना दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या यावेळी तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड सरपंच रुखमाबाई आरके भाजपाचे तालुका अध्यक्ष निळकंठ मस्के भाजपाचे अनिल वाघमारे नगरसेवक गोपू महामुने उपसरपंच बाबाराव चौधरी विलास पाटील चौधरी प्रकाश दादा गायकवाड किसनराव मारबते नंदकुमार जोशी विजय आमले हर्षदीप दीक्षित कुलदीप घोडेकर आनंदा हिंगाडे निलेश तायडे अविनाश भोयर विनायक मुसळे शेख इमरान जितू चोले शेख मोईज लाभार्थी बंडू शेवाळे शेंडे शुभम भवरे यांचे सह मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते यावेळी तहसीलदार किशोर यादव यांनी धडाकेबाज निर्णय घेत घरकुल लाभार्थ्यांना जिल्ह्यात पहिल्यांदा पुढाकार घेऊन वाळू उपलब्ध करून दिल्याने त्यांचा वडसा पडसा टाकळी या तिन्ही गावातील नागरिकाकडून जाहीर सत्कार करण्यात आला

## काजळेश्वर येथे आप्पा स्वामी मंदीरा जवळील शेतातील विद्युत खांब कोसळले . जीवीत हाणी टळावी करीता विद्यूत विभागाने कार्यवाही करावी . मागणी

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाडः**
**कारंजा तालुक्यातील**

काजळेश्वर परीसरात झालेल्या अतीवृष्टीमुळे व चक्रीवादळामुळे आप्पा स्वामी मंदीरा जवळील शेतकऱ्यांच्या शेतामधील विद्यूत खांब कोसळल्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण झाला आहे तर काजळेश्वर व पानगव्हान शेतशिवारात विद्यूत रोहीत्र कोसळल्याने अडथडा निर्माण झाला आहे . तेव्हा कारंजा विद्यूत उपविभागीय कार्यालयाने घटणेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत उपयायोजना करावी अशी शेतकरी वर्गाकडून मागणी केली जात आहे . वृत्त असे की काजळेश्वर परीसरात नुकताच चक्रीवादळ सदृष्य तुफान पाऊस झाला . या पावसाने गावातील अनेकांच्या घरावरील टिनपत्रे उडालीत मातीचे घरे असलेल्यांच्या बहूतांश भिंती कोसळल्यात तर शेतातील विद्युत खांब; रोहीत्र कोसळले . यात आप्पा स्वामी मंदीराजवळील काजळेश्वर शेत सर्वे नं ११९ गजाननराव भड यांच्या शेतातील विद्यूत खांब कोसळले . त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांच्या जीवीत्वास सुरक्षीततेच्या दृष्टिणे धोका निर्माण झाला . विद्युत लाईन कोसळल्याने परीसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो आहे . तेव्हा या घटनेची कारंजा महावितरण कार्यालयाने त्वरीत दखल घ्यावी .पडलेले विद्युत खांब पुर्नरस्थापित करावीत किवा नवीन खांब बसऊन विद्यूत नियमीत करून घ्यावी अशी मागणी शेतकरी गजाननराव भड यांनी केली आहे . दुसरीकडे





पानगव्हान शिवारातील प्रभाकर उपाध्ये यांचे शेतातील रोहीत्र व काजळेश्वर शिवारातील अनील हेंडस्कार यांच्या शेतीतील रोहीत्र चक्रीवादळात कोसळले आहे . त्यांचे कारंजा महावितरणने रोहीत्र बसऊन द्यावे व विद्यूत नियमीत करुन द्यावी अशी लेखी स्वरूपात पत्र देऊन मागणी महावितरण कारंजा कार्यालयाला प्रभाकर उपाध्ये; अनील हेडस्कार या शेतक-यांनी केली आहे .

## शिवसेना जिल्हा समन्वयकपदी डॉ. सिद्धार्थ देवळे

### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार नियुक्ती

महाराष्ट्र जीत ...तालुका प्रतिनिधी
.अजय भगत.... मंगरूळपीर....



महाराष्ट्र जीत

**मंगरूळपीर :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वात वाशीम जिल्ह्यातील संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने, डॉ. सिद्धार्थ देवळे यांची वाशीम जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सिद्धार्थ देवळे हे पक्षाशी दीर्घकाळ निष्ठेने जोडलेले असून, त्यांच्या कार्यक्षेत्रात सामाजिक, राजकीय आणि आरोग्य विषयक योगदान लक्षणीय राहिले आहे. पक्षाच्या विचारधारेप्रती निष्ठा आणि जिल्ह्यातील विविध स्तरांवरील संपर्कक्षमता लक्षात घेऊन त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शिवसेना नेहमीच नव्या आणि कार्यक्षम नेतृत्वाला संधी देत आली आहे. वाशीम जिल्हा हा पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, आगामी काळात पक्ष संघटन, कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण आणि जनतेपर्यंत शिवसेनेचा अजेंडा पोहचवण्यासाठी डॉ. देवळे यांचे नेतृत्व मोलाचे ठरेल, असा विश्वास पक्षनेतृत्वाने व्यक्त केला आहे. या नियुक्तीनंतर वाशीम जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. अनेक स्थानिक कार्यकर्त्यांनी डॉ. देवळे यांचे कौतुक होत आहे. त्यांच्या या निवडीने जिल्ह्यात नव्या जोमाने संघटन बांधणी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## किनी येथे आज संत भिमा भोई यांचा१७५ वा जयंती सोहळा

महाराष्ट्र जीत

**भोकर / प्रतिनिधी**



भोई समाजाचे आराध्य दैवत संत कवी भिमा भोई यांची १७५ वी जयंती उत्सव मौजे किनी येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमा निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असुन गावकऱ्यांनी व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भोई समाज मंडळ किनीच्या वतीने करण्यात आले. संत कवी भीमा भोई हे ओरिसातील एक महत्त्वाचे संतकवी यांचा जन्म १८५० मध्ये ओरिसा मधील मधुपूरच्या रायराखोल येथे झाले. भीमा भोई यांचे बालपण कष्टात गेले ते लहानपणा पासून ते अंध होते. भीमा भोई यांना भोई समाजाने आराध्य दैवत मानले होते. म्हणून त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मौजे किनी व परिसरात भोई समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्यात आहे. त्यामुळे किनी येथे दि. २५ मे २०२५ रोजी रविवारी भीमा भोई जयंती कार्यक्रम सोहळा आयोजित करण्यात आला आहे . सकाळी ७ वाजता ध्वजारोहण होणार आहे . दुसऱ्या सत्रात ८ वाजता भजनी मंडळाच्या नीनानात संत कवी भीमा भोई यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. ९ वाजता मान्यवराच्या उपस्थित जयंती कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष गणपत पांडलवाड अ.भा.भोई समाज जिल्हा अध्यक्ष हे राहणार आहेत, तर प्रमुख अतिथी म्हणून भूमारेड्डी गड्डमवार सरपंच प्रतिनिधी, दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड अध्यक्ष भाजपा तालुका भोकर, विजयालक्ष्मी करमगार अध्यक्ष महिला काँग्रेस कमिटी भोकर, नरसारेड्डी गोपीडवाड ज्येष्ठ नेते, सुभाष नाईक किनीकर जिल्हा संघटक शिवसेना नांदेड तथा सचिव (ग्रामीण ) व्हाइस ऑफ मीडिया नांदेड हे राहणार आहेत, तर अन्य उपस्थितांमध्ये दिनेश कुम्मरवाड, सत्यनारायण रेड्डी कोतुरवाड, नवीनरेडी करेमगार ,नरेश रेड्डी कासाररेड्डी, रविंद्ररेड्डी बोंतलवाड,नरेशरेड्डी सल्लावाड, माधव पा.भूतनर, सुधाकररेड्डी दोडनगार, बाबुराव कांबळे व्हाईस चेअरमन, नागोराव रसाळे, संतोष नुग्रावार, गंगाधर तुरटीकर, मधुकर बासनुरे, सयाजी बासनुरे, नागनाथ लोलपवाड, पिराजी उमेलवार, लक्ष्मण दादा कोरडे आदींची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमानंतर सकाळी दहा वाजेपासून महाप्रसाद आयोजित केला आहे. तरी किनी व परिसरातील मंडळींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चेअरमन रामलु बकावाड, माजी चेअरमन दत्ता तोकलवाड, रामलु बकावाड, विठ्ठल बकावाड, गंगाधर बकावाड, दशरथ टोकलवाड, लक्ष्मीबाई तोकलवाड, मोहन बक्कलवाड यांनी केली आहे.

## अकरावी प्रवेश प्रक्रियेवर मार्गदर्शन शिबिर

### (यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर विद्यालयात शिबिर)

महाराष्ट्र जीत

**कारंजा** ता. प्र.- कारंजा येथून जवळच असलेल्या ग्राम यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयात पालक व विद्यार्थ्यांसाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. सदर शिबिराला पालकसह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक विजय भड यांनी सांगितले की, सोमवार पासून (दि. 26) प्रत्यक्ष अकरावी प्रवेशाचा अर्ज व प्राधान्यक्रम भरण्यास सुरुवात होणार आहे. यंदा प्रथमच अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया होत आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइनसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कॉलेज निवड, ऑनलाइन प्रणाली, प्रवेशाच्या गुणवत्ता यादीसह इतर महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पालक राजेंद्र ठाकरे,राजाराम इंगळे, ईश्वर मडामे, दीपक भगत आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बौद्धांच्या आर्थिक विकासाचे कोणाला काही पडले आहे काय ?

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून अनेक पक्षांची सरकारे आली. त्या त्या राज्य शासनाने बऱ्याच आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती केली आहे. अनुसूचित जातीतील समूहांमध्ये कौशल्य विकास, आर्थिक विकास आणि स्वयं रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्या म्हणून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची १९७८ साली निर्मिती करण्यात आली. या महामंडळाचे लाभार्थी अनुसूचित जातीमध्ये नमूद असलेल्या सर्व घटक जाती आहेत. या महामंडळाकडून १९७८ ते जानेवारी २०१७ या कालावधीत एकूण ५,५१,२९७ लाभार्थ्यांना २६२ कोटी ७८ लाख ८७ हजार रुपये देण्यात आले आहेत. असे असताना तरी देखील मातंग समाजासाठी वेगळं असे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) (स्थापना १९८५) निर्माण करण्यात आले. ते का निर्माण केले आणि त्यामागे काय कारण असावं ? १९८५ ला सदर विकास महामंडळाचे भाग भांडवल २.५० कोटी रुपये होते व ते १००० कोटी पर्यंत वाढिवण्यात आले आहे. (विशेष म्हणजे शासन निर्णय क्र. संकिर्ण-2021/प्र.क्र. 46/ महामंडळे/दिनांक 08 जुन, 2022 अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रू. ३०० कोटीवरून रु १००० कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे.) तसेच चांभार, ढोर, होलार, मोची इ. समाजाकरिता संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्या.) (स्थापना १९७४) स्थापन करण्यात आले आहे. राज्यात चर्मोद्योगाचा विकास, प्रोत्साहन व चालना देणे.चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसीत करणे, चर्मवस्तूंसाठी बाजारपेठेची निर्मीती, चर्मकार समाजासाठी चर्मोद्योग व इतर व्यवसायासाठी विविध कर्ज योजना राबविणे व आर्थिक सहाय्य देणे हा मुख्य उद्देश दिसून आला. १९७४ ला चर्मोद्योग विकास महामंडळाचे शासकीय भाग भांडवल ५ कोटी रुपये होते व आज ते ७३.२१ कोटी रुपये आहे. राज्यातील जे समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. अश्या घटकांच्या विकासासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना दिनांक १९९८ साली केलेली आहे. या विकास महामंडळ अंतर्गत प्रामुख्याने मराठा समाजाचे लाभार्थी आहेत. एकंदरीत राज्यसरकारच्या आर्थिक विकास महामंडळाचा इतिहास पाहता सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकांच्या विकास करण्यापासून ते महाराष्ट्रात जातिचे समीकरण जोडण्यापर्यंतचा प्रवास राहिला आहे. शासनाने सर्व अनुसूचित जातीतील घटकांना सामावून घेणार आर्थिक विकास महामंडळ स्थापन केलेले असताना देखील विशेष स्वतंत्र जातींचे विकास महामंडळ निर्माण करणे तसेच निवडणुकीच्या तोंडावर ज्या जाती प्रगत आहे. त्यांच्याकडे अर्थव्यवस्थेच्या नाड्या आहेत असे ब्राम्हण, जैन आणि राजपूत सारख्या प्रगत समाजाकरीता सुद्धा महामंडळाची निर्मिती करणे यातून राज्य सरकारची विकास महामंडळाच्या आड असलेली जातीय राजकारणाचे प्रदर्शन घडत आहे. हे तिन्ही समाज हे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सबळ असून जवळपास प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांचे वर्चस्व आहे. विशेष करून जैन समाज हा आर्थिक दृष्ट्या राष्ट्रीय पातळीवर प्रभावशाली आहे तसेच श्रीमंत समाज म्हणून त्याची ओळख आहे. सन फार्मा इंडिया, अडाणी ग्रुप, लोढा ग्रुप, हिंदुस्थान शिपयार्ड लिमिटेड इत्यादी. अनेक कंपन्या या जैन समाजातील लोकांच्या आहेत. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत हा समाज १ टक्का देखील नसून देशाच्या एकूण संपत्ती पैकी २८ टक्के संपत्ती ह्या समाजाकडे एकवटलेली आहे. दुसऱ्या बाजूला ब्राम्हण समाज हा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या प्रगत असून, या समाजाचे प्रतिनिधी सर्वच क्षेत्रात पहिला मिळतात. सिनेसृष्टी, प्रसार माध्यमे, सार्वजनिक क्षेत्रात इत्यादी. या ठीकाणी ब्राम्हण, जैन, राजपूत यांचा प्रभाव दिसून येतो. तसेच ते राजकीय प्रभाव वापरून समाजातील लोकांची कामे हक्काने करून घेतात. अनुसूचित जातीतील विशेष जातींचा राज्यशासनाकडून त्यांच्या आर्थिक विकासाचा जर खरोखरच गांभीर्याने विचार होत असेल तर मग बौद्ध समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सत्तेत आलेले प्रत्येक राज्यसरकार असे उदासीन का आहे ? बौद्ध समाजाच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र बौद्ध आर्थिक विकास महामंडळ का असू नये ?
महाराष्ट्रात बौद्ध हा मोठा सामाजिक घटक असून त्याचे राजकीय सामाजिक उपद्रव मूल्य अधिक असल्याने, त्याला सर्व जाती जाणीवपूर्वक एकाकी पाडल जात असल्याचे स्पष्ट होते. २०११ च्या जणगणने नुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ५.८१% इतकी लोकसंख्या बौद्धांची आहे. परंतु जैन व इतर अल्पसंख्यांक समूहाच्या तुलनेत बौद्ध समाज हा मागास आहे. ज्याअर्थी, मातंग, चर्मकार तत्सम इतर जातीची स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळे आहेत तसेच ते महात्मा फुले मागासवर्ग विकास मंडळाचे सुद्धा लाभार्थी असून विशेष स्वतंत्र महामंडळाचे देखील लाभ घेतात. परुंतु बौद्ध समाजाला धार्मिक अल्पसख्यांक दर्जा असून देखील त्याचे स्वतंत्र असे आर्थिक विकास महामंडळ आजपर्यंत का निर्माण केले गेलेले नाही ? बौद्धांच्या आर्थिक प्रगतीकरीता स्वतंत्र असे किमान २००० कोटी रु. भाग भांडवल असलेले 'बौद्ध आर्थिक विकास महामंडळ' निर्माण होणे हे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून बौद्धांमध्ये व्यवसाय, उद्योजगता, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल अर्थात महाराष्ट्राच्या आर्थिक विकासमध्ये बौद्ध समाजाचा मोठा वाटा राहील.
सर्व बौद्ध संघटनांनीं तसेच आंबेडकरवादी सामाजिक राजकीय पक्ष संघटनांनी याचा गांभीर्याने करून महाराष्ट्रभर संविधानिक मार्गाने याची मागणी करायला पाहिजे. कीमान आपल्या मतदार संघात मत मागायला येणाऱ्या उमेदवारांकडे या मागणीसाठी जोर लावयला पाहीजे.

**पत्रकार दिलीप मादाळे दैनिक महाराष्ट्र जीत**
**(9545660727)**

## यावर्डीच्या विद्यार्थ्यांचा विभा अभिज्ञा मध्ये सहभाग यावर्डीच्या नियती व वैष्णवी चा विभा अभिज्ञा शिबिरात सहभागी

### (विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रद्योगिक सस्थान नागपूर येथे आयोजन,विदर्भातील 66 विद्यार्थ्याचा सहगाभी, 13 तंत्रज्ञान प्रयोग शाळेला भेट, यावर्डीच्या दोन विद्यार्थीनीचा सहभाग)

महाराष्ट्र जीत




**कारंजा तालुका प्रतिनिधी-** 19&20 मे 2025 रोजी श्री बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील मुख्याध्यापक तथा विज्ञान शिक्षक विजय भड व कु. नियती घोडराव, कु. वैष्णवी ठाकरे यांनी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रद्योगिक सस्थान,नागपूर (व्हीएनआयटी) येथे आयोजित विज्ञान भारती अभिज्ञा मध्ये सहभागी झाले होते. याबद्दल सविस्तर वृत्त असे की, विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ व विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रद्योगिक सस्थान, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने विभा अभिज्ञा कार्यशाळेचे आयोजन व्हि.एन.आय.टी, नागपूर येथे करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये उद्घाटन प्रसंगी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील व प्रभारी कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार यांनी विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र व त्याची व्याप्ती तसेच जैवतंत्रज्ञान यासंदर्भात उद्घाटनाप्रसंगी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, विज्ञान विषयांमध्ये आवड निर्माण व्हावी व संशोधन वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी याकरिता विज्ञान भारतीच्या माध्यमातून सदर उपक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यशाळेमध्ये संपूर्ण विदर्भातून 66 विद्यार्थी व 30 शिक्षक सहभागी झाले होते. या कार्यशाळेत नागपूर येथील प्रसिद्ध संस्था व्ही एन आय टी मधील तेरा प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या. त्यामध्ये आयओटी, व्हर्च्युअल लॅब, प्रोसेस इन्स्ट्रुमेंटेशन लॅब, रिव्हर्स इंजीनियरिंग लॅब,सी एन सी मशीन लॅब, अडव्हान्स मोबिलिटी टेक्नॉलॉजी,5 जी लॅब, ईएमसी लॅब व आकाश दर्शन अशा एकूण 13 प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना जाण्याचा योग लाभला व तेथील आधुनिक तंत्रज्ञान कसे कार्य करते याची विस्तृत माहिती विद्यार्थी,शिक्षक व पालकांना देण्यात आली. व्ही. एन. आय. टी. सारख्या नामांकित संस्थेमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा बघण्यासाठी प्रवेश मिळणे ही अशक्य बाब आहे परंतु हा सुवर्णयोग विज्ञान भारती प्रदेश मंडळ नागपूर यांच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळाला. या संपूर्ण दोन दिवसीय कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या ज्ञानाबद्दल विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ व व्ही. एन. आय. टी. संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयातील कु. वैष्णवी ठाकरे व कु. नियती घोडराव या विद्यार्थ्याचे संस्था अध्यक्ष योगेश केशवराव खोपे, सचिव हरिदास गंद्रे व समस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी कौतुक केले.

## आ. भीमराव केराम यांच्या पाठपुराव्याला यश

### माहूर. किनवट तालुक्यात होणार 33/11 केव्ही उपकेंद्रे

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**



**श्रीक्षेत्र माहूर :-** माहूर किनवट तालुक्यातील होणारा विजेचा तुटवडा लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी 33/11 के व्ही उपकेंद्र उभारणीसाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून त्यांनी केलेल्या मागणीनुसार नांदेड परिमंडळाचे कार्यकारी अभियंता प्रशासन यांनी किनवट तालुक्यातील मोहपूर,पाटोदा खुर्द, पारडी खुर्द कोल्हारी व माहूर तालुक्यातील हडसणी येथे नवीन 33/11 के व्ही उपकेंद्र उभारणीकरिता तांत्रिक व्यवहारात व जागेची उपलब्धता बाबत पडताळणी करून तसा अहवाल सादर करण्याचे आदेश अधीक्षक अभियंत्यांना दिले आहेत. या उपकेंद्रामुळे वारंवार भेडसावणाऱ्या विजेची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. किनवट माहूर तालुक्यातील अनेक भागात वारंवार विजेचा तुटवडा निर्माण होतो.33/11 उपकेंद्राअभावी कुठे कमी दाबाचा वीज पुरवठा तर कुठे तांत्रिक बिघाडामुळे वारंवार विजेची समस्या निर्माण होते.दरम्यान मोहपूर पाटोदा खुर्द पारडी खुर्द कोल्हारी तसेच माहूर तालुक्यातील हडसणी या भागातील विजेची निकड लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी या भागात 33/11 केव्ही उपकेंद्र मंजुरीसाठी शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला.त्यांच्या पत्राची दखल घेऊन महावितरण नांदेड परिमंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी 9 मे 2025 रोजी विद्युत कार्यालयाचे अधीक्षक अभियंता यांना पत्र दिले असून किनवट तालुक्यातील मोहपुर, पाटोदा खुर्द,पार्टी खुर्द, कोल्हारी तसेच माहूर तालुक्यातील हडसणी येथे नवीन विज उपकेंद्र उभारणीबाबत तांत्रिक व्यवहारता व जागेची उपलब्धता या बाबत पडताळणी करून तसा अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत.तांत्रिक बाबी व जागेचा पडताळणी अहवाल सादर झाल्यानंतर विद्युत उपकेंद्र उभारणीचा प्रश्न मार्गी लागणारा असून या उपकेंद्रामुळे मोहपूर, पाटोदा खु, पार्डी खु, कोल्हारी तसेच माहूर येथील हडसनी या भागातील विजेची समस्या कायमस्वरूपी मिटणार असल्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

## झोडगा येथील ग्रामपंचायतीना बायोमॅट्रिक प्रणाली बसविण्यात यावी ,, कुलदिप चव्हाण,गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला,

महाराष्ट्र जीत

(प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही). सारकिन्ही, बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या झोडगा गावात ग्रामसेवकांना मुख्यालयाची ऍलर्जी अपडाऊनमुळे गावांच्या विकासाला ब्रेक होत आहे शासकीय कर्मचाऱ्यांना वेळेचे बंधन लागून प्रशासकीय कार्यालयात बायोमॅट्रिक प्रणाली सुरू करण्यात यावी अशी मागणी कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला यांनी निवेदन द्वारे बिडीओ साहेबना केली आहे मात्र बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या झोडगा गावाचा विकासाची धुरा असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयात अद्यापही बायोमॅट्रिक प्रणाली सुरू झाली नसल्याने ग्रामसेवक कर्मचाऱ्यांची मनमानी सुरूच आहे ग्रामसेवकाच्या अपडाऊनमुळे झोडगा गावांच्या विकासाला ब्रेक लागल्याने शासनाने ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली सुरू करावी अशी मागणी झोडगा येथील ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे प्रत्येक गावातील ग्रामपंचायत अशी निगडित कामासाठी ग्रामसेवकांची सतत वाट बघत बसण्याची वेळ अनेक दिवसापासून झोडगा येथील नागरिकांवर येत आहे कारण ग्रामसेवक हे बाहेर गावाहून अपडाऊन करतात त्यामुळे अनेकदा नागरिकांना विविध कागदपत्रांसाठी ग्रामपंचायत कार्यालय बाहेर ताटकळत बसावे लागते यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली कार्यान्वित करून ग्रामविकासाला योग्य चालना द्यावी अशी मागणी कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला व ग्रामस्थांकडून व्यक्त केली आहे जिल्ह्यातील ग्रामपंचायत मध्ये शासनाच्या माध्यमातून ग्रामविकासाला चालना देणाऱ्या शेकडो योजना राबविल्या जातात परंतु प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक प्रकारचे दाखले आठ अ ,तसेच जन्म मृत्युपत्र लागतात अनेकदा ग्रामसेवक हे पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे दिसतात त्यामुळे अनेकदा नागरिक हक्काच्या योजनेपासून वंचित राहावे लागते शासनाद्वारे जाहीर झालेल्या योजना साठी विशिष्ट मुदतीत कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक असते सदर योजनेच्या लाभासाठी लागणारी कागदपत्रे शासनाचा दुवा असलेले ग्रामसेवक हे अधिकारी यांच्याकडून घ्यावे लागतात परंतु सदर कर्मचारी मुख्यालय राहण्याचा शासनाचा आदेश धाब्यावर बसवीत ग्रामपंचायतचे ग्रामसेवक , हे अधिकारी मुख्यालय राहत नाही त्यामुळे नागरिकांना परेशानी होते परंतु शासनाने ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली बसविल्यास सदर कर्मचारी मुख्यालय राहतील आणि ग्रामपंचायत भवन उघडे ठेवण्याची वेळ सुद्धा वाढेल यासाठी लोकप्रतिनिधी नि शासनाकडे बायोमॅट्रिक प्रणालीसाठी पाठपुरावा करीत नागरिकांचा त्रास वाचून ग्राम विकासाला चालना देण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी झोडगा येथील नागरिक द्वारे होत आहे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक यांना मुख्यालय राहण्याचे आदेश देण्यात यावी अशी मागणी झोडगा येथील कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला यांनी निवेदन द्वारे बिडीओ साहेबना मागणी केली आहे तसेच झोडगा येथील ग्रामस्थांकडून होत आहे

## मा. खासदार निवेदिता माने यांच्या शुभहस्ते संदीप राक्षे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान..

महाराष्ट्र जीत

पोलीस मित्र असोसिएशन व वेद फाऊंडेशन इचलकरंजी यांच्या वतीने सामाजिक, साहित्यिक, पर्यावरण, पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणारा "जीवनगौरव पुरस्कार" यंदा लेखक आणि समाजसेवक संदीप राक्षे यांना प्रदान करण्यात आला. मा. खासदार निवेदिता माने यांच्या शुभहस्ते, रविवार ११मे २०२५ रोजी रोटरी क्लब हॉल इचलकरंजी येथे आयोजित एका भव्य समारंभात हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. भाग्यरेखा पाटील, अनिता गभाले, शितल बिडकर उपस्थित होते. संदीप राक्षे यांनी सामाजिक कार्याबरोबरच साहित्य क्षेत्रातही आपल्या लेखणीतून पर्यटनाचे ऐतिहासिक कार्य केले आहे. त्यांच्या विचारशील लेखनीतून अपरिचित स्थळांना परिचय मिळाला असून, विविध सामाजिक उपक्रमांतून त्यांनी गरजूंसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. यावेळी बोलताना मा. खासदार निवेदिता माने म्हणाल्या, "संदीप राक्षे यांचे कार्य हे नव्या पिढीसाठी




प्रेरणादायी आहे. समाजातील वंचितांना आधार देण्याचे त्यांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. त्यांच्या कार्यातून सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा मिळेल. हा सन्मान केवळ एक पदक किंवा प्रमाणपत्र नाही, तर त्यांच्या अथक परिश्रमांची, समाजसेवेच्या समर्पणाची आणि विचारशक्तीने प्रज्वलित झालेल्या समाजप्रेमाची पावती आहे. संदीप राक्षे यांनी केवळ लेखनच नाही तर सामाजिक कार्यातूनही आपला अमूल्य ठसा उमटवला आहे. त्यांच्या विचारांतून आणि कार्यातून माणुसकीचा ओलावा दिसतो. वंचितांसाठी केलेले कार्य, पर्यावरण संवर्धनासाठी घेतलेले पुढाकार, तसेच शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान हे निश्चितच प्रेरणादायी आहे. या सन्मानाने संदीप राक्षे यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, त्यांनी यापुढेही समाजहितासाठी आपले प्रयत्न अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. हा सन्मान म्हणजे एका नव्या प्रवासाची सुरुवात आहे. संदीप राक्षे यांच्या पुढील वाटचालीसाठी हा एक दीपस्तंभ ठरेल. त्यांच्या कार्यातून अधिकाधिक लोकांना प्रेरणा मिळेल आणि समाजसेवेच्या या व्रताला नवा आयाम मिळेल. संदीप राक्षे यांना या गौरवपूर्ण सन्मानाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा! आपल्या लेखणीतील तेज आणि समाजसेवेतील समर्पण असेच अखंड राहो, हीच अपेक्षा! पुरस्काराचे आयोजन वेद फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. रजनी शिंदे व डॉ. युवराज मोरे यांनी केले होते, त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे..

## स्वर्गीय कोठुजी कुंभारे वसतीगृहाचे इचलकरंजीत उद्घाटन

महाराष्ट्र जीत

**इचलकरंजी(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**
मुंबईतील दानशूर समाज बांधव कै . कोठूजी कुंभारे यांच्या स्मृती चिरंतर ठेवण्याच्या उद्देशाने बांधलेल्या कै. कोठूजी कुंभारे वसतीगृहाचे उद्घाटन हम्पी येथील गायत्री पिठाचे अधिपती श्री श्री श्री दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या शुभहस्ते, व महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव सातपुते व मॅनिंजिंग ट्रस्टी अंकुशराव उकार्डे यांचे प्रमुख उपस्थित दिमाखदारपणे संपन्न झाले महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाने केलेल्या आर्थिक मदतीने व श्री देवांग समाज रजिस्टर इचलकरंजी यांनी या वसतिगृहाचे बांधकाम केले आहे . याप्रसंगी मार्गदर्शन करताना स्वामीजींनी कोष्टी समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार, आर्थिक प्रगती व समाजाची एकता होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. प्रारंभी देवांग समाज अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे व त्यांच्या पत्नी सौ विद्याताई यांच्या हस्ते त्यांची पाद्यपूजा करण्यात आली. स्वामीजींचा सत्कार महाराष्ट्र कोष्टी समाजसेवा मंडळ मुंबईचे अध्यक्ष श्री प्रकाशराव सातपुते व अंकुशराव उकार्डे यांचे हस्ते व कोष्टी फेडरेशनचे अध्यक्ष श्री



अरुणराव वरोडे यांच्या उपस्थित संपन्न झाला. स्वागत व प्रास्ताविक देवांग समाजाचे अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंडित ढवळे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन श्री राजेंद्र सांगले यांनी केले. याप्रसंगी देवांग समाजाच्या चौंडेश्वरी गृहनिर्माण, महिला मंडळ, महिला पतसंस्था, युवा संघटना इत्यादी विविध संस्थांच्या वतीने स्वामीजींचा सत्कार करण्यात आला. या उद्घाटन प्रसंगी , निमंत्रित ट्रस्टी, श्री राजेंद्र ढवळे, उपाध्यक्ष उदयराव बुगड, सल्लागार विश्वनाथ मुसळे, श्री विठ्ठलराव डाके, महासचिव रामचंद्र निमणकर, सचिव मिलिंद कांबळे उदयराव बुगड , महिला कार्याध्यक्ष सौ स्मिता सातपुते, तसेच सौ स्मिता बगड,सौ संगीता धूत्रे ,श्रीमती प्रीती बुगड,सौ दीपा सातपुते, श्रीमती सुशीला फाटक ,सौ उज्वला कबाडे ,सौ.रूपा बुगड तसेच दिलीप भंडारे ,शितल सातपुते विलास पाडळे, डी,एम कस्तुरे ,राजेंद्र चांगले, प्रमोद मुसळे, कुमार कबाडे मधुकर वरुटे ,आनंदा साखरे, उत्तम म्हेत्रे, जयेश बुगड राहूल सातपुते दयानंद लिपारे महेश ढवळे इत्यादी मान्यवर तसेच समाज बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इगोले




## प्रतिनिधी नेमणे आहे

संपूर्ण महाराष्ट्रात " दैनिक महाराष्ट्र जीत" या अल्पवधी लोकप्रिय झालेल्या दैनिक वृत्तपत्रास काम करावयास सुवर्णसंधी आता प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे नवनिर्वाचित प्रतिनिधी छायाचित्रकार लेखक जाहिरातदार नेमणे आहे चला संधीचा फायदा...


### संपर्क

मुख्य संपादक :
**सागर राणा अंभोरे**
मो. 99210 45121

संपादक :
**बंडूभाऊ इंगोले**
मो. 96044 30002

ड्रॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक कारंजा जी. वाशीम